**नियमित फौजदारी खटला क्रं. १५६/२०२१**
**शासन वि. सुकु उर्फ शिवकुमार**
**नि.क्र. ४४ .**

**सरकार तर्फे साक्षीदार क्रं. २**

**नांव – दिनेश राजू कारभारी**

**वय – ३२ वर्षे, कामधंदा – शिक्षव शेती.**

**रा. – लोहारा ता. उदगीर**

**साक्षीदार यांच्या शपथेवर सरतपास सरकारतर्फे अधिवक्ता श्री. ए.एस. कदम यांचेद्वारे शपथेवर सुरुः–**

दि २४/०२/२०२१ रोजी केस मधील घटना घडली होती. ती आमच्या घराच्या समोर घडली होती. शिवकुमार पाईप घेवून आले मी घरात होते त्यावेळस बाहेर गोंधळ झाला. पाईप दरवाज्यावर मारल्याचा आवाज आला. मग आमची आई बाहेर गेली. आईची किंकाळीचा आवाज आल्यानंतर आमचा गणेश गेला. मी गोंधळ पुर्ण झाल्यानंतर गेलो. माझ्या आईच्या तोंडातून रक्त येत होते. आमच्या भैयाला मार लागला होता. तो पोट धरुन पडला होता. मोटर सायकलाच्या डिकीवर पाईप ने मारल्यामुळे डिकीवर चिर पडलेली होती. आमच्याकडे दोन तीन माणसे आली व भांडणे सोडवली व शिवकुमार भैया यांनी मला माझ्या आईला व भावाला जिवे मारण्याची धमकी दिली. पुढे पोलीस केस झाली.

**साक्षीदार क्र. २ चा उलटतपास आरोपी क्र. १ ते ३ तर्फे श्री. पी.एस. बिरादार विधीज्ञ सुरु**

भांडणाचा प्रकार चालु होता तेव्हा मी घरात होतो. त्यावेळी भांडणे सोडण्यासाठी संजू धणूरे आणि एक बाई होती तीचे मला नाव सांगत येत

नाही. भैयाला मार कशाने लागला होता मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**फेरतापास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2025.07.02 15:14:53 +0530

दिनांक – ०१/०७/२०२५

न्यायदंडाधिकारी प्र.व.
(न्यायालय क्रं. १), उदगीर.